एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०

नि. क्रमांक. ०९ खाली .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- अभिषेक किसन सातकर,

वय सुमारे :- २५ वर्षे, व्यवसाय :- पान सेंटर,

निवासस्थान :- कान्हे, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

**०१.** मी मौजे कान्हे येथे राहतो.माझे ब्लॉसम हॉटेल शेजारी कान्हे फाटा येथे पान शॉप आहे. दि. ०३ फेब्रुवारी २०२० रोजी १०.४५ वा च्या सुमारास मी पान शॉपमध्ये असताना रस्त्यावर जोराचा आवाज आल्याने मी रस्त्यावर येऊन पाहिले असता एका इसमास कारने ठोकर मारली होती. पादचारी इसम हा मुंबईकडून पुणे बाजूकडे चालत जात होता त्यावेळी त्यास कार चालकाने पाठीमागून ठोकर मारली होती. पादचारी इसमास डोक्याला व पायाला मार लागला होता. सदर इसम हा जागेवरच मरण पावला होता. ठोकर मारणारा इसम हा आमच्या गावातीलच शशिकांत कुटे हा होता. अपघात हा कार चालकाच्या चुकीमुळे झाला होता. घटनास्थळावरील जमलेल्या लोकांपैकी एकाने मृताच्या नातेवाईकाला फोन केला. मृताच्या नातेवाईकाने पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०३.** घटनेच्या वेळी माझे पान सेंटर हे ब्लॉसम हॉटेलच्या शेजारी होते. माझ्या पान शॉपचे तोंड हे पूर्व बाजूस आहे. अपघाताच्या वेळी मी पान शॉपच्या आतमध्ये बसलो होतो.

घटनास्थळी महामार्ग पूर्वेकडे पुण्यास जातो. हे म्हणणे खरे नाही की, टाकवे गावाकडे जाणा-या रस्त्यावर चौक असल्यामुळे वाहनांचा वेग कमी होतो. रामदास सातकर हे माझे सखे चुलते आहेत. लक्ष्मण ठाकर यास मी सुरुवातीपासून ओळखतो कारण ते गावातील रहिवाशी आहेत. घटनास्थळापासून टपरीमधील अंतर हे शंभर फुट असू शकते. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडतांना मी प्रत्यक्षात पाहिलेला नाही.

०४. पोलीसांनी माझा जबाब अपघाताच्या दुस-या दिवशी नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी पोलीसांना जबाब दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झालेला आहे. सुलभा सोमनाथ ठाकर, राणी रामदास ठाकर, ओमकार सोमनाथ ठाकर हे मयत इसमाच्या घरातील नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर हे माझ्या गावातील रहिवाशी असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. ०२/०७/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०

नि. क्रमांक. ०९ खाली .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- रामदास महादु सातकर,

वय सुमारे :- ५५ वर्षे, व्यवसाय :- हॉटेल,

निवासस्थान :- कान्हे, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

**०१.** मी मौजे कान्हे येथे राहतो. माझा हॉटेलचा व्यवसाय आहे. हॉटेलचे नाव ब्लॉसम हॉटेल असे आहे व ते कान्हे येथे आहे. सन २०२० मध्ये सकाळी १०.३० वा च्या सुमारास मी हॉटेलमध्ये हजर होतो. मुंबई पुणे महामार्गावर आवाज आल्यामुळे मी हॉटेलच्या बाहेर आलो. बाहेर आलो असता एका पादचारी इसमास कारने पाठीमागून ठोकर मारली होती. सदर कार हि मुंबईकडून पुणेकडे जात होती. सदर पादचारी इसम हा माझ्या गावचा रहिवाशी होता. अपघातामध्ये सदर इसमास डोक्यास व पाठीमागच्या बाजूस मार लागला होता. पायास देखील मार लागला होता. सदर इसम जागीच मरण पावला होता. अपघात करणारा इसम हा गावातीलच कुटे नावाचा व्यक्ती होता. अपघात हा कार चालकाच्या चुकीमुळे झाला होता. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब घटनेच्या दुस-या दिवशी नोंदवला होता.

०२. अपघातानंतर अपघातातील इसमाचा नातेवाईक पुतण्या यास मी फोन करुन अपघाताबद्दल कळवले. त्यानंतर पुतण्याने जखमी इसमास दवाखान्यात नेले. पुतण्याने अपघाताची तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०३.** मी जन्मापासून कान्हे येथील रहिवाशी आहे. माझे हॉटेल हे कान्हे फाटा येथे सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे आहे.पुणे मुंबई महामार्ग हा पुर्व पश्चिम असा आहे. मुंबई बाजूकडून आल्यानंतर टाकवे बाजूकडे जाताना चौक लागतो. हे म्हणणे खरे आहे की, टाकवे गावामध्ये अनेक कंपन्या असल्यामुळे अनेक वाहने पुणे मुंबईकडे जातात. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी हॉस्पीटलजवळ चौकामध्ये स्पीड ब्रेकर आहे. स्पीड ब्रेकर असल्यामुळे वाहनांचा वेग कमी होतो. माझ्या हॉटेलच्या जवळ पुढील बाजूस झेब्रा क्रॉसींग आहे.

०४. लक्ष्मण ठाकरे यांना मी ओळखतो कारण ते गावातील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघात घडल्याचे मला लक्ष्मण ठाकरे याने सांगितले होते. आता माझे हॉटेल चालू नाही. माझे हॉटेल तीन चार वर्षापासून चालू नाही. हे म्हणणे खरे आहे की, टाकवेकडे जाणारा रस्ता असल्यामुळे तेथे वाहनांचा वेग कमी होतो. अपघात झाला त्यावेळी मी हॉटेलच्या बाहेर उभा होतो. सुलभा सोमनाथ ठाकर, राणी रामदास ठाकर, ओमकार सोमनाथ ठाकर हे मयत इसमाच्या घरातील नातेवाईक आहेत. यांना मी लहानपणापासून ओळखतो.

०५. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर घटनास्थळावर लोकांची गर्दी जमली होती व लोकांकडून मला मयताचे नाव समजले होते. हॉटेलपासून अपघाता स्थळाचे अंतर हे २०० फुट आहे. मयताचे घर हे साई सेवाधामच्या विरुध्द बाजूस आहे. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा कोणाच्या चुकीमुळे झाला हे मी सांगू शकत नाही. अपघात हा ३ किंवा ४ ऑगस्टला झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर हा माझ्या गावातील रहिवाशी असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. ०२/०७/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**